www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**A**

# Paper-II
# HISTORY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ....................................

(Name) ....................................

2. (Signature) ....................................

(Name) ....................................

Seat No. [ | | | | | | ]

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. [ | | | | | | ]

(To be filled by the Candidate)

## SEP - 10221

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **100**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper II will be compulsory.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. Use only Blue/Black Ball point pen.
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 100 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

www.prepp.in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

SEP - 10221/II—A

# History
## Paper II
# इतिहास
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **शंभर (100)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which of the following methods is *not* a scientific method of exploration of archaeological sites ?
   (A) Lerichi periscope
   (B) Aerial Photography
   (C) Electrical Resistance Surveying
   (D) Study of village names

2. Which of the following sites does *not* belong to the Neolithic period ?
   (A) Burzahom
   (B) Chirand
   (C) Tekkalkotta
   (D) Ahichchhatra

3. The evidence of Iron smelting furnace was found in the excavation of Megalithic site ...................... in Maharashtra.
   (A) Mahurjhari
   (B) Borgaon
   (C) Junapani
   (D) Naikund

1. खालीलपैकी कोणती पद्धत ही पुरातत्त्वीय स्थळांच्या समन्वेषणाची शास्त्रीय पद्धत **नाही** ?
   (A) लेरिसी परिदर्शक
   (B) हवाई छायाचित्रण
   (C) विद्युत्प्रतिरोध सर्वेक्षण
   (D) गावांच्या अभ्यासाचे नाव

2. खालीलपैकी कोणते स्थळ नवाश्म कालखंडाशी संबंधित **नाही** ?
   (A) बुर्झहोम
   (B) चिरांद
   (C) टेक्कलकोट्टा
   (D) अहिच्छत्र

3. महाराष्ट्रातील ............... या महापाषाणीय स्थळाच्या उत्खननात लोखंड वितळविण्याच्या भट्टीचे अवशेष सापडले.
   (A) माहूरझरी
   (B) बोरगाव
   (C) जुनापाणी
   (D) नैकुंड

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



4. Cemetery of Harappan period is not found at ...................... .
   (A) Farmana
   (B) Rakhigarhi
   (C) Surkotada
   (D) Kuntasi

5. The Harappan site Rakhigarhi is situated in ............................... .
   (A) Hissar District of Haryana
   (B) Muzaffarnagar District of Uttar Pradesh
   (C) Rohtak District of Haryana
   (D) Rupnagar District of Punjab

6. In the Vedic texts Vrihi means .................................... .
   (A) Wheat
   (B) Rice
   (C) Barley
   (D) Moong

7. In Vedic Samhitas, the term Jana denotes ............................. .
   (A) Dialect
   (B) Caste
   (C) Tribe
   (D) Family

4. हडप्पाकालीन दफन भूमी ................... येथे सापडली नाही.
   (A) फरमाना
   (B) राखीगढी
   (C) सुरकोटडा
   (D) कुंतासी

5. हडप्पा संस्कृतीतील राखीगढी हे ठिकाण ......................... येथे आहे.
   (A) हरियानातील हिसार जिल्हा
   (B) उत्तरप्रदेशातील मुजफ्फरनगर
   (C) हरियानातील रोहतक जिल्हा
   (D) पंजाबमधील रूपनगर जिल्हा

6. वैदिक ग्रंथात व्रीहीला .......................... असे म्हटले आहे.
   (A) गहू
   (B) तांदूळ
   (C) जव
   (D) मूग

7. वैदिक संहितामध्ये 'जन' या संज्ञेचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :
   (A) बोलीभाषा
   (B) जात
   (C) आदिवासी समाज
   (D) कुटुंब

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



8. The Barabar cave inscriptions of the Mauryan king Dasharath mention the excavation of the caves for the .......................... .

(A) Jains

(B) Buddhists

(C) Bhagavatas

(D) Ajivikas

9. Who among the following was a royal physician of Bimbisara ?

(A) Chellana

(B) Jivaka

(C) Khema

(D) Chetaka

10. An inscribed image of the Mauryan king Ashok has been found from ......................... .

(A) Amaravati

(B) Nagarjunakonda

(C) Kanaganahalli

(D) Jggayyapeta

8. मौर्य राजा दशरथ याच्या बराबर लेणी शिलालेखात ......................... यांच्यासाठी लेणी कोरल्याचा उल्लेख आहे.

(A) जैन

(B) बौद्ध

(C) भागवत

(D) आजीविक

9. बिंबिसाराचा राजवैद्य पुढीलपैकी कोण होता ?

(A) छेलल्लना

(B) जीवका

(C) खेमा

(D) चेतका

10. मौर्य सम्राट अशोक याची अभिलेखीत प्रतिमा .................................... येथून प्राप्त झाली आहे.

(A) अमरावती

(B) नागार्जुनकोंडा

(C) कनगनहल्ली

(D) जग्गयपेटा

www.prepp.in



11. The first inscriptional reference of Bharatvarsha is recorded at .......... .
    (A) Girnar Inscription of King Ashoka
    (B) Hathigumpha Inscription of King Kharavela
    (C) Prayag Prashasti of King Samudragupta
    (D) Junagadh Rock Inscription of Rudradaman

12. The discovery of .................... inscription throws new light on genealogy of the Kushana dynasty.
    (A) Rabatak
    (B) Kandahar
    (C) Taxila
    (D) Bamiyan

13. Bodhisattva is the stage when :
    (A) A person leaves home and becomes wanderer for knowledge
    (B) A person becomes reformer and fight against social evils
    (C) A person becomes next to Buddha and generates awakening and compassion
    (D) A person becomes supreme head of a monastery and takes care of each one

11. सर्वप्रथम 'भारतवर्ष'चा उल्लेख कोणत्या पुराभिलेखात आहे ?
    (A) गिरणार येथील सम्राट अशोकचा अभिलेख
    (B) हाथीगुहेतील खारवेल राजाचा अभिलेख
    (C) समुद्रगुप्तराजाची प्रयाग प्रशस्ती
    (D) रुद्रदमनचा जुनागड येथील प्रस्तर लेख

12. .......................... शिलालेखाच्या शोधानंतर कुषाण राजवंशाच्या वंशावली वर नवाप्रकाश पडला आहे.
    (A) रबाटक
    (B) कंदहार
    (C) तक्षशिला
    (D) बामियान

13. बोधिसत्व स्थितीमध्ये ......................
    (A) व्यक्ती गृह त्याग करतो आणि ज्ञानप्राप्तीसाठी भटका होतो
    (B) व्यक्ती सुधारक होतो आणि सामाजिक अडचणींच्या विरुद्ध लढतो
    (C) व्यक्ती बुद्धपदाच्या जवळ पोहोचतो, भूतदया बाळगतो व तसेच तो सर्वज्ञान प्राप्तीच्या निकट असतो
    (D) व्यक्ती बुद्ध विहाराचा प्रमुख बनतो आणि सर्वांची काळजी घेतो

14. Which of the following is *not* an example of Buddhist Stupa sites ?
   (A) Pavani
   (B) Bhitargaon
   (C) Bhattiprolu
   (D) Vaishali

15. Which of the following cities was located on the junction of Uttarapatha and Dakshinapatha, the trade routes of ancient India ?
   (A) Mathura
   (B) Prayag
   (C) Dwarka
   (D) Hampi

16. The statue of Poseidon, the Roman sea god was found at the site .......... in Maharashtra.
   (A) Brahmapuri
   (B) Bhokardan
   (C) Junnar
   (D) Adam

17. Which of the following scholars has recently identified the king Chandra mentioned in the Mehrauli Pillar inscription with Gupta king Samudragupta ?
   (A) Shriram Goyal
   (B) Parameshvarilal Gupta
   (C) Ram Sharan Sharma
   (D) Amiteshvar Jha

14. खालीलपैकी कोणते स्थळ बौद्ध स्तूप असलेले स्थळ **नाही** ?
   (A) पवनी
   (B) भीतरगाव
   (C) भट्टीप्रोलु
   (D) वैशाली

15. प्राचीन भारतीय व्यापारीमार्गांमध्ये खालीलपैकी कोणते शहर उत्तरपथ आणि दक्षिणपथ या मार्गांच्या छेदबिंदू वर वसलेले होते ?
   (A) मथुरा
   (B) प्रयाग
   (C) द्वारका
   (D) हम्पी

16. महाराष्ट्रातील .................... या स्थळावरून पोसीडॉन या रोमन सागरी देवतेची प्रतिमा मिळाली.
   (A) ब्रह्मपुरी
   (B) भोकरदन
   (C) जुन्नर
   (D) अडम

17. खालीलपैकी कोणत्या अभ्यासकाने अलीकडे महरौली स्तंभलेखात उल्लेखित राजा चंद्र याची ओळख गुप्त सम्राट समुद्रगुत सोबत केलेली आहे ?
   (A) श्रीराम गोयल
   (B) परमेश्वरीलाल गुप्त
   (C) रामशरण शर्मा
   (D) अमितेश्वर झा



prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



18. A Damodarpur plate describes uparika as ....................

(A) Court official

(B) Provincial official

(C) Village official

(D) Trade official

19. Several images of Bodhisattva ........................ have been found in Gandhara art.

(A) Maitreya

(B) Manjushri

(C) Samantabhadra

(D) Akashagarbha

20. Which of the following Gupta kings had issued a gold coin which depicts a rhinoceros ?

(A) Chandragupta II

(B) Samudragupta

(C) Kumaragupta I

(D) Skandagupta

21. Who is the author of the famous Allahabad Prasasti ?

(A) Harisena

(B) Kalidasa

(C) Sudraka

(D) Ravikirti

18. दामोदरपुर पटानुसार उपारीक म्हणजे .........

(A) दरबारातील अधिकारी

(B) प्रांतिक अधिकारी

(C) ग्राम अधिकारी

(D) व्यापार-उद्दीम अधिकारी

19. ...................... या बोधिसत्त्वाच्या अनेक प्रतिमा गंधार कलेत सापडल्या आहेत.

(A) मैत्रेय

(B) मंजुश्री

(C) समंतभद्र

(D) आकाशगर्भ

20. खालीलपैकी कोणत्या गुप्त सम्राटाने गेंड्याचे अंकन असणारे सुवर्ण नाणे काढले होते ?

(A) द्वितीयचंद्रगुप्त

(B) समुद्रगुप्त

(C) प्रथमकुमारगुप्त

(D) स्कंदगुप्त

21. प्रसिद्ध अलाहाबाद प्रशस्तीचा लेखक कोण आहे ?

(A) हरिसेन

(B) कालिदास

(C) शूद्रक

(D) रविकीर्ती

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



22. Junagadh Rock Inscription referred to Rudradamana as ....................

(A) Chakravartin

(B) Lord of Dakshinapatha

(C) King of the sea (Arabian Sea)

(D) Maharaja

23. The second Buddhist Council was held at Vaishali under the presidentship of ........................ .

(A) Sambhuta

(B) Upagupta

(C) Revata

(D) Sabbakami

24. Which of the following is the earliest known epigraphic evidence mentioning the custom of Sati ?

(A) Eran pillar inscription of Bhanugupta

(B) Bilsad pillar inscription of Kumaragupta I

(C) Mathura pillar inscription of Chandragupta II

(D) Allahabad pillar inscription of Samudragupta

22. जुनागड शिलालेखमध्ये रुद्रदमनला खालीलपैकी कोणते बिरुद दिले आहे ?

(A) चक्रवर्ती

(B) दक्षिणपथस्वामी

(C) समुद्राचा राजा (अरबी समुद्र)

(D) महाराजा

23. वैशाली येथील द्वितीय धर्म संगिती ............. यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

(A) संभूत

(B) उपगुप्त

(C) रेवत

(D) सब्बकामी

24. खालीलपैकी कोणता सतीप्रथेचा उल्लेख असणारा प्राचीन ज्ञात शिलालेखीय स्रोत आहे ?

(A) भानूगुप्त याचा एरण स्तंभलेख

(B) कुमारगुप्त I याचा बिलसड स्तंभलेख

(C) चंद्रगुप्त II याचा मथुरा स्तंभलेख

(D) समुद्रगुप्त याचा अलाहाबाद स्तंभलेख

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



25. Amarawati Stupa was constructed during the period of the .............. .

(A) Satavahana

(B) Chola

(C) Pandya

(D) Cheras

26. Who was the only king of the Vakataka dynasty who took the title of 'Samrat' ?

(A) Vindhyashakti

(B) Rudrasen I

(C) Pravarsen I

(D) Pruthvishen I

27. In early medieval Deccan, Upakriti and Kanika were .......................... .

(A) Names of queens

(B) Customary taxes

(C) System of checking metal purity

(D) Practice of saluting the feudal lord

28. The phrase - 'Dushtanigraha-Shishtapratipalana', occurs constantly in the inscriptions of ............................ .

(A) The Hoysalas

(B) The Chalukyas

(C) The Rashtrakutas

(D) The Yadavas

25. अमरावती स्तूपाची निर्मिती कोणत्या राजवटीमध्ये झाली ?

(A) सातवाहन

(B) चोल

(C) पांड्य

(D) चेर

26. वाकाटक राजघराण्याच्या खालीलपैकी कोणत्या राजाने 'सम्राट' ही उपाधी घेतली होती ?

(A) विंध्यशक्ती

(B) रुद्रसेन पहिला

(C) प्रवरसेन पहिला

(D) पृथ्वीसेन पहिला

27. पूर्वमध्ययुगीन दख्खन प्रदेशातील उपकृती आणि कनिका म्हणजे ........................ .

(A) राण्यांची नावे

(B) पारंपरिक कर

(C) धातूची शुद्धता तपासण्याची पद्धत

(D) सरंजामदारा समान वंदना देण्याची पद्धत

28. खालीलपैकी कोणत्या राजांच्या अभिलेखांमध्ये 'दुष्टनीग्रह-शिष्टप्रतीपालन' असा वाक्यांश सतत येतो ?

(A) होयसळ

(B) चालुक्य

(C) राष्ट्रकूट

(D) यादव

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



29. The famous *Chaurapanchasika* (The Love Thief) of 11th Century was composed by ...................... .

(A) Bilhana

(B) Kalhana

(C) Hemadri

(D) Someshwara

30. The poets Periyalvar and Nammalvar belonged to which of the following religious traditions ?

(A) Mahanubhav

(B) Ajivika

(C) Alvar

(D) Nayanmar or Nayanar

31. In early medieval Deccan, portion of freshly yielded paddy given to temple, brahmanas, rulers and the various kinds of labourers of the village, were indicated by the term............................ .

(A) Sarvabharanam

(B) Bhrtyavargaposanam

(C) Gramposanam

(D) Sarvajivanam

29. 11व्या शतकातील सुप्रसिद्ध चौरपंचसिक (प्रेमीचोर)ची रचना कोणी केली ?

(A) बिल्हन

(B) कल्हन

(C) हेमाद्री

(D) सोमेश्वर

30. पेरियालवार आणि नम्मालवार हे कवी खालीलपैकी कोणत्या धार्मिक परंपरेचे होते ?

(A) महानुभाव

(B) आजीविक

(C) अलवार

(D) नायणमार/नायनार

31. पूर्वमध्ययुगीन दक्खान परदेशात नव्याने पिकावलेल्या तांदुळाचा काही भाग देवालय, ब्रम्हंवृंद, शासक आणि विविध श्रमजीवी वर्गांमध्ये वितरित करण्याच्या पद्धतीस ............ असे संबोधले जात होते.

(A) सर्वभरणम्

(B) भृत्यवर्गपोषणम्

(C) ग्रामपोषणम्

(D) सर्वजीवनम्

www.prepp.in



32. What is the subject matter of the following texts – *Mayamata, Manasara, Kamikagama* ?
(A) Political philosophy
(B) Varna-jati samskara
(C) Ritual practices in central India
(D) Temple architecture

33. *Tevaram* belonged to .................... .
(A) Tantrik Buddhism
(B) Tantrik Jainism
(C) Shaivism
(D) Vaishnavism

34. In the fourteenth century, the route from Ghazni and Kabul to Delhi was via ............................ .
(A) Lahore
(B) Multan
(C) Amritsar
(D) Udaipur

35. After Qutbuddin Aibak's death, who among the following asserted independence in Sindh ?
(A) Bakhtiyar Khilji
(B) Jalaluddin Mangarbarani
(C) Ali Mardan
(D) Qubacha

32. मायामाता, मानसारा, कामिकागामा या ग्रंथाचा विषय कोणता आहे ?
(A) राजकीय तत्वज्ञान
(B) वर्ण जातिसंस्कार
(C) मध्य भारतातील धार्मिक विधी
(D) मंदिर स्थापत्य

33. **तेवरम्हे** खालीलपैकी कोणत्या धर्मपरंपरेशी जोडले गेले आहे ?
(A) तांत्रिक बौद्ध धम्म
(B) तांत्रिक जैन धर्म
(C) शैवपंथ
(D) वैष्णवपंथ

34. चौदाव्या शतकात गझनी आणि काबूलवरून दिल्लीला येण्याचा रस्ता ............... मार्गे होता.
(A) लाहोर
(B) मुलतान
(C) अमृतसर
(D) उदयपूर

35. कुतबूद्दीन ऐबकच्या मृत्यूनंतर पुढीलपैकी कोणी सिंधमध्ये स्वतंत्र सत्ता घोषित केली ?
(A) बखतियार खिलजी
(B) जलालुद्दीन मंगरबरणी
(C) अलिमरदान
(D) कुबाचा

36. Other than at Daulatabad, where in the Deccan can we find examples of Tughlaq architecture ?

(A) Khush Mahal in Warangal

(B) Durgam Cheruvu in Hyderabad

(C) Taj Bawadi in Bijapur

(D) Madrasa in Bidar

37. In the 15th century, the .............. tried to replace the Tamil peasant elite by granting lands to the temples.

(A) Pandya rulers

(B) Vijayanagar rulers

(C) Nayakas

(D) Pālaiyakārārs

38. Of the five Deccani Sultanates, which ones were founded by Afaqi nobles ?

(A) Only Ahmednagar and Bidar

(B) Bidar, Berar and Golconda

(C) Bijapur, Berar and Ahmednagar

(D) Bijapur, Golconda and Bidar

36. दख्खनमध्ये दौलताबाद व्यतिरिक्त कुठे आपल्याला तुघलक स्थापत्याचे उदाहरण सापडतात ?

(A) वारांगलमधील खुशमहल

(B) हैद्राबादमधील दुर्गम चेरूवू

(C) विजापूरमधील ताज बावडी

(D) बिदरमधील मदरसा

37. पंधराव्या शतकात ................ नी मंदिरांना दान देऊन अभिजात तमिल शेतकरी वर्गाची जागा बदलण्याचे प्रयत्न केले.

(A) पांड्य राजा

(B) विजयनगर राजा

(C) नायका

(D) पलैयाकारार

38. दख्खनी पाच सलतनतीपैकी कोणती सलतनत अफाकी सरदाराद्वारे स्थापन करण्यात आली होती ?

(A) फक्त अहमदनगर आणि बिदर

(B) बिदर, बेरार आणि गोलकोंडा

(C) विजापूर, बेरार आणि अहमदनगर

(D) विजापूर, गोलकोंडा आणि बिदर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



39. Who wrote the *Dandaniti-prakaranam* ?
    (A) Keshav Pandit
    (B) Gagabhatta
    (C) Nischalapuri
    (D) Venkatadhvari

40. Who among the following historians said that the Kakatiya king Prataparudra marks the beginning of two different state systems in the Deccan ?
    (A) Richard Eaton
    (B) John F. Richards
    (C) Kenneth R. Hall
    (D) Stewart Gordon

41. The *Madurāvijayam* is a Sanskrit source that describes .................... .
    (A) The attack on the Pandya kingdom of Madurai by Malik Kafur
    (B) Rajaraja Chola's expedition into north India
    (C) The expansion of the Vijayanagar kingdom into Madurai territory
    (D) The trade links between Madurai and Indonesia

39. दंडनीती प्रकारानम कोणी लिहिले ?
    (A) केशव पंडित
    (B) गागाभट्ट
    (C) निश्चलपुरी
    (D) वेंकटाध्वरी

40. काकतीय राजा प्रतापरूद्राचा काळ दख्खनमध्ये दोन वेगळ्या राज्य व्यवस्थेची सुरुवात करतो. असे विधान पुढीलपैकी कोणत्या इतिहासकाराने केले आहे ?
    (A) रिचर्ड इटन
    (B) जॉन एफ. रिचर्ड्स
    (C) केनेथ आर. हॉल
    (D) स्टीवर्ट गॉर्डन

41. मदुराविजयम् एक संस्कृत साधन आहे यामध्ये .................... वर्णन आहे.
    (A) मलिक कफूर द्वारा मदुराईच्या पांड्य राज्यांवर केलेला हल्ला
    (B) राजराजा चोलाची उत्तरभारतावरील मोहीम
    (C) मदुराई प्रदेशातील विजयनगर राज्यांचा विस्तार
    (D) मदुराई आणि इंडोनेशियामधील व्यापारी संबंध

www.prepp.in



42. The establishment of the Sultanate is seen as marking a distinct phase of history in North India because of ............................... .

(A) The expansion of urban centres

(B) The rise of the Rajputs to power

(C) Economic decline

(D) The end of the caste system

43. Why is Iltutmish regarded as the first independent Muslim sovereign of India ?

(A) He had the *khutba* read in his name

(B) He defeated all his opponents

(C) He was officially designated as Sultan by Aibak

(D) He was given a letter of investiture by the Caliph

44. The *iqtadari* system was introduced in North India by ..................... .

(A) Qutbuddin Aibak

(B) Iltutmish

(C) Jalaluddin Khilji

(D) Alauddin Khilji

42. उत्तर भारताच्या इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण कालखंड म्हणून सल्तनतींच्या स्थापनेकडे पाहिले जाते ते प्रामुख्याने या कारणामुळे .......... .

(A) नागरी केंद्रांचा विस्तार

(B) राजपुतांच्या सत्तेचा उत्कर्ष

(C) आर्थिक ऱ्हास

(D) जातिव्यवस्थेचा शेवट

43. हा भारतातील प्रथम स्वतंत्र सार्वभौम राजा म्हणून इलतुतमिश का मानला जातो ?

(A) त्याने स्वत:च्या नावाने खुतबां वाचायला लावले

(B) त्याने सर्व निरोधकांचा पराभव केला

(C) ऐबक याने त्याला सुलतान म्हणून अधिकृतपणे नामित केले

(D) त्याला खलिफाकडून मान्यतेचे पत्र दिले गेले

44. ................. ने उत्तर भारतात इकतादारी पद्धतीची सुरुवात केली.

(A) कुत्बुद्दीन ऐबक

(B) इलतुतमिश

(C) जलालउद्दीन खिलजी

(D) अलाउद्दीन खिलजी

Prepp Your Personal Exams Guide



45. In the period of the Delhi Sultanate, what was meant by *usar* land ?
    (A) Rich and fertile land
    (B) Land that was irrigated by canals
    (C) Land that was irrigated by wells and tanks
    (D) Barren or uncultivable land

46. Which Sufi poet talks of printed cloth as *khand chap* ?
    (A) Amir Khusrau
    (B) Mulla Daud
    (C) Dadu Dayal
    (D) Mir Maqbul

47. Where is the *Qila Rai Pithora* located ?
    (A) In Delhi
    (B) In Jaunpur
    (C) In Chittor
    (D) In Kanauj

48. Jahangir visited Ujjain to :
    (A) Meet the ruler of the region
    (B) Visit the Vaishnava ascetic Jadrup
    (C) Reorganise the administration of the province
    (D) Establish a southern capital

45. दिल्ली सलतनतच्या काळात उसर जमिनीचा काय अर्थ होतो ?
    (A) समृद्ध आणि सुपीक जमीन
    (B) कालव्यांनी सिंचन केलेली जमीन
    (C) विहीर आणि हौदच्या मदतीन सिंचन केलेली जमीन
    (D) बंजर किंवा लागवडीखाली नसलेली जमीन

46. छापलेल्या कापडाला खंड छाप हे नाव कोणता सूफी संत वापरतो ?
    (A) आमिर खुसरो
    (B) मुल्ला दाऊद
    (C) दादु दयाल
    (D) मीर मकबूल

47. किल्ला राइ पिथौरा कुठे स्थित आहे ?
    (A) दिल्लीमध्ये
    (B) जौनपूरमध्ये
    (C) चित्तोरमध्ये
    (D) कन्नोजमध्ये

48. जहांगीरने उज्जैनला कशासाठी भेट दिली ?
    (A) तेथील राजाला भेटण्यासाठी
    (B) जद्रूप या वैष्णव साधूला भेटण्यासाठी
    (C) त्या परगण्याच्या प्रशासनाची पुनर्रचना करण्यासाठी
    (D) दक्षिणेत राजधानी स्थापन करण्यासाठी

www.prepp.in



49. Who wrote Gitawali, Kavitawali and Vinaya Patrika ?
    (A) Tulsidas
    (B) Surdas
    (C) Chaitanya
    (D) Namadeva

50. In medieval Maharashtra, *mā gatakā* was a tax on ............... .
    (A) Weavers
    (B) Dyers
    (C) Carpenters
    (D) Share croppers

51. Who among the following historians has characterised the Bijapur state as 'feudal' ?
    (A) M.A. Nayeem
    (B) J.F. Richards
    (C) Richard Eaton
    (D) Salma Farouqui

52. Battered walls are a distinctive feature of the architecture of the .......................... .
    (A) Tughlaqs
    (B) Sayyids
    (C) Lodis
    (D) Jaunpur

49. गीतावली, कवितावली आणि विनयपत्रिका कोणी लिहिले ?
    (A) तुलसीदास
    (B) सूरदास
    (C) चैतन्य
    (D) नामदेव

50. मध्यकालीन महाराष्ट्रात ............... वर मागटका हा कर लावला जाई.
    (A) विनकर
    (B) रंगारी
    (C) सुतार
    (D) खंडकरी

51. पुढीलपैकी कोणत्या इतिहासकाराने विजापूर राज्याचे सरंजामशाही म्हणून वर्णन केले आहे ?
    (A) एम. ए. नयीम
    (B) जे. एफ. रिचर्ड्स
    (C) रिचर्ड इटन
    (D) सलमा फारूकी

52. डतार भिंत हे .................. च्या स्थापत्याचे विशिष्ट वैशिष्ट्य आहे.
    (A) तुघलक
    (B) सय्यद
    (C) लोदी
    (D) जौनपूर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



53. Mica decoration on the outside of monuments are typical of the ......... period of Sultanate architecture.

(A) Khalji

(B) Tughlaq

(C) Sayyid

(D) Lodi

53. स्मारकांच्या बाहेरील बाजूस मायकाची सजावट हे सलतनत काळातील ................ काळाचे वैशिष्ट्य आहे.

(A) खलजी

(B) तुघलक

(C) सय्यद

(D) लोदी

54. In the Nur Jahan Junta, there was a core of .................. members.

(A) Two

(B) Three

(C) Four

(D) Five

54. नूरजहान जुनतामध्ये .................... सदस्यांचा मिळून होतात.

(A) दोन

(B) तीन

(C) चार

(D) पाच

55. Who among the following is known as '*dayad*' in the Maratha polity ?

(A) Watandar

(B) Jagirdar

(C) Mirasdar

(D) Saranjamdar

55. मराठा राजनीतीत पुढीलपैकी कोणाला 'दायाड' म्हणून ओळखला जात होता ?

(A) वतनदार

(B) जागीरदार

(C) मिरसदार

(D) सरंजामदार

56. The Amalguzar or revenue collector was incharge of ....................... .

(A) Subah

(B) Sarkar

(C) Pargana

(D) Village

56. आमालगुजर किंवा महसूल गोळा करणारा ...................... चा प्रभारी होता.

(A) सुभा

(B) सरकार

(C) परगणा

(D) गाव

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



57. Which of the following buildings was not constructed by Akbar at Fatehpur Sikri ?

(A) Jodhabai's palace

(B) Moti Masjid

(C) Turkish Sultana's palace

(D) Panch Mahal

58. What was *ijara* ?

(A) The system of revenue farming

(B) The tax to be paid on entry into a market town

(C) The tax to be paid when re-shipping goods from a port

(D) The system of share-cropping

59. What do the words *eri*, *srota*, *kinaru* and *vapi* have in common ?

(A) All refer to guilds of merchants

(B) All refer to different kinds of irrigation sources

(C) All refer to different kinds of cloth

(D) All refer to dyes

57. फतेहपूरसिक्रीत पुढीलपैकी कोणती इमारत अकबरने नाही बांधली ?

(A) जोधाबाईचा महल

(B) मोती मस्जिद

(C) तुर्की सुलतानाचा महल

(D) पंच महल

58. इजारा काय होते ?

(A) महसूल शेतीची पद्धत

(B) बाजारपेठेत असलेल्या शहरात प्रवेश करताना भरला जाणारा कर

(C) बंदरावरून माल पुन्हा जहाजात पाठवण्यासाठी भरला जाणारा कर

(D) खंडकरी पद्धत

59. ऐरी, स्रोत, किनारू आणि वापी या शब्दात काय साम्य आहे ?

(A) सर्व व्यापारीश्रेणीला संबोधतात

(B) सर्व शब्दविविध सिंचनसाधन संबोधतात

(C) सर्व शब्दविविध प्रकारचे कापड संबोधतात

(D) सर्व शब्दविविध प्रकारचे रंग संबोधतात

Prepp
Your Personal Exams Guide



60. The three most important items of trade in the intra-Asian network were ........................ .
    (A) Silk, cotton cloth and pepper
    (B) Gold, silver and horses
    (C) Cotton cloth, pepper and horses
    (D) Pepper, silk and horses

61. The art of Bidriware is traced to the patronage and the facilities provided by ........................... .
    (A) Feroz Shah Bahmani
    (B) Ibrahim Adil Shah
    (C) Mahmud Gawan
    (D) Malik Ambar

62. With which Raja did Pilaji Rao Gaikwad establish contact, to get safe bases inside Gujarat ?
    (A) The Raja of Rajpipla
    (B) The Jadeja rulers of Saurashtra
    (C) Kadam Bande of Khandesh
    (D) The Raja of Ramnagar

63. What do the words *bhandarvada* and *muamala* have in common ?
    (A) Both are names of taxes on land
    (B) Both refer to methods of assessment
    (C) Both are methods of collection
    (D) Both are words meaning crown land

60. आशिया अंतर्गत व्यापार जाळ्यात ........ या तीन महत्त्वांचा व्यापारी वस्तू होत्या.
    (A) रेशीम, कापसाचे कापड आणि काळी मिरी
    (B) सोना, चांदी आणि घोडे
    (C) कापसाचे कापड, काळी मिरी आणि घोडे
    (D) काळी मिरी, रेशीम आणि घोडे

61. बिद्री कलेची सुरुवात ............... ने दिलेल्या आश्रय आणि सुविधांमुळे झाली.
    (A) फिरोज शाह बाहमणी
    (B) इब्राहिम आदिल शाह
    (C) माहमूद गवन
    (D) मलिक अंबर

62. गुजरातमध्ये सुरक्षित आधार घेण्यांसाठी पिलाजीराव गायकवाड याने कोणत्या राजाशी संपर्क प्रस्थापित केला ?
    (A) राजपिपलचा राजा
    (B) सौराष्ट्राचे जडेजा राजे
    (C) खानदेशाचे कदम बांडे
    (D) रामनगरचा राजा

63. भंडारवाडा आणि मुआमला या शब्दात काय साम्य आहे ?
    (A) दोन्ही जमिनी वरच्या करांची नावे आहे
    (B) दोन्ही शब्द महसुलीच्या पद्धती संबोधतात
    (C) दोन्ही महसूल गोळा करण्याच्या पद्धती आहे
    (D) दोन्ही शब्दांचा अर्थ राजची जमीन असा होतो

www.prepp.in



64. Pits and vats located at Kalpi, Sangamner, Zafrabad, Khuldabad & Erandol are associated with .......... .
   (A) Glass Manufacture
   (B) Indigo
   (C) Paper
   (D) Saltpetre

65. Who was the first Indian ruler to welcome Vasco-da-Gama ?
   (A) Jahangir
   (B) Chanda Saheb
   (C) Zamorin
   (D) Muzaffar Jung

66. The immediate successor of Clive was ............................. .
   (A) Verelst
   (B) Cartier
   (C) Warren Hastings
   (D) Philip Francis

67. The battle of Biderra was fought between ............................. .
   (A) The English and the French
   (B) The English and the Dutch
   (C) The English and the Portuguese
   (D) The French and Nawab's Army

64. काल्पी, संगमनेर, जाफराबाद, खुलताबाद आणि एरंडोल येथे स्थित असलेले खड्डे आणि कुंड कशांशी संबंधित आहेत ?
   (A) कांच उत्पादन
   (B) नीळ
   (C) कागद
   (D) सॉल्टपीटर (सोरामीठ)

65. वास्को-द-गामाचे स्वागत करणारा पहिला भारतीय शासक कोण होता ?
   (A) जहांगीर
   (B) चंदा साहेब
   (C) झामोरीयन
   (D) मुझफ्फर जंग

66. क्लाईव्ह नंतर आलेला अधिकारी ........... होता.
   (A) वेरेलस्ट
   (B) कार्टीयर
   (C) वॉरेन हेस्टिंग्स
   (D) फिलिप फ्रान्सिस

67. बिदेराचे युद्ध ........................ दरम्यान लढले होते.
   (A) इंग्रज आणि फ्रेंच
   (B) इंग्रज आणि डच
   (C) इंग्रज आणि पोर्तुगीज
   (D) फ्रेंच आणि नावाबचे सैन्य

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



68. Who was known as 'Colonel Clive's Jackal' in the eighteenth Century India ?
   (A) Amichand
   (B) Jagat Seth
   (C) Mir Jafar
   (D) Mir Qasim

69. The 'Black Hole' was famous as :
   (A) Residence of Nawab Siraj-ud-Daula
   (B) Important residence for Royal family
   (C) Entrance name of Port William
   (D) Tiny prison cell

70. In March 1757, the British conquered this French Colony in India :
   (A) Pondicherry
   (B) Chandernagore
   (C) Mahe
   (D) Karikal

71. This Act broke the trade monopoly of the East India Company and opened Indian Trade to all British Merchants :
   (A) Pitts India Act, 1784
   (B) Regulating Act, 1793
   (C) Charter Act, 1813
   (D) Charter Act, 1815

68. 'कर्नल क्लाइव्ह जॉकोल' म्हणून अठराव्या शतकातील भारतात कोण ओळखला जात असे ?
   (A) अमीचंद
   (B) जगत सेठ
   (C) मीर जाफर
   (D) मीर कासिम

69. 'काळी कोठडी' ही कशासाठी प्रसिद्ध होती ?
   (A) नवाब सिराज-उद्दोल्लाचे निवासस्थान
   (B) शाही घराण्याचे राहण्याचे महत्त्वाचे ठिकाण
   (C) पोर्ट विल्यम किल्ल्याच्या द्वाराचे नाव
   (D) तुरुंगातील कैद्यांसाठीचा लहान विभाग

70. मार्च 1757 मध्ये इंग्रजांनी भारतातील कोणती फ्रेंच वसाहत जिंकून घेतली ?
   (A) पॉन्डिचेरी
   (B) चंद्रनगर
   (C) माहे
   (D) कारिकल

71. ईस्ट इंडिया कंपनीचे भारतात व्यापार करण्याचे सर्वाधिकार या कायद्याने रद्द झाले आणि भारताचा व्यापार सर्व ब्रिटिश व्यापाऱ्यांना खुला झाला.
   (A) पिट्स इंडिया एक्ट, 1784
   (B) रेग्यूलेटिंग एक्ट, 1793
   (C) चार्टर एक्ट, 1813
   (D) चार्टर एक्ट, 1815

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



72. Which of the following Governor Generals introduced the *Laissez Faire* policy of trade ?

(A) Lord Cornwallis

(B) Mountstuart Elphinstone

(C) Lord Hastings

(D) Lord Dalhousie

73. Name the first anthropologist who used the term "Dravidian" to denote the South Indian people :

(A) Dr. S. K. Chatterji

(B) Dr. B. S. Guha

(C) Sir Herbert Risley

(D) Bishop Caldwell

74. What revenue system did Elphinstone introduce in Bombay Presidency ?

(A) The permanent settlement

(B) Ryotwari system

(C) Mahalwari system

(D) Talukdari system

75. H. T. Princep was associated with :

(A) Legal Codification

(B) Army Reforms

(C) Orientalist Education

(D) Anglicist Education

72. खालीलपैकी कोणत्या गव्हर्नर जनरलने मुक्त व्यापाराचे धोरण सुरू केले ?

(A) लॉर्ड कॉर्नवॉलीस

(B) माउंटस्टूअर्ट एल्फिन्स्टन

(C) लॉर्ड हेस्टिंग्स

(D) लॉर्ड डलहौसी

73. दक्षिण भारतीय लोकांना संबोधण्यासाठी 'द्रविडीयन' ही संज्ञा कोणत्या मानवशास्त्रज्ञाने प्रथम वापरली ?

(A) डा. एस. के. चट्टेरजी

(B) डा. बी. एस. गुहा

(C) सर हर्बर्ट रिस्ली

(D) बिशप कॅल्डवेल

74. मुंबई प्रांतात एल्फिन्स्टनने कोणती जमीन महसूल व्यवस्था लागू केली ?

(A) कायमधारा पद्धत

(B) रयतवारी पद्धत

(C) महालवारी पद्धत

(D) तालुकदारी पद्धत

75. एच. टी. प्रिन्सेप खालीलपैकी कशाशी संबंधित होते ?

(A) कायदे संहिता

(B) सैन्य सुधारणा

(C) प्राच्यविद्या शिक्षण

(D) आंग्लविद्या शिक्षण

76. Under which Charter Act was the Law Commission set up in India ?

(A) Charter Act of 1793

(B) Charter Act of 1813

(C) Charter Act of 1833

(D) Charter Act of 1853

77. Benign aspects of colonialism can be seen from the example of this person, who learnt the basics of science in the service of Sir John Malcolm and wrote a tract called Rasayanashastra :

(A) Erloo Bin Narayan

(B) Shripati Sheshadri

(C) Gangaram Tambat

(D) Ramji Bin Ganoji Chowgule

78. What was the Rahnumai Mazdyasan Sabha ?

(A) Parsee Sports Club

(B) Faction of the Parsee Panchayat

(C) Parsee Social Reform Organisation

(D) Parsee Charitable Hospital

76. भारतात लॉ कमिशनची स्थापना कोणत्या सनदी कायद्यांने करण्यात आली ?

(A) 1793 चा सनदी कायदा

(B) 1813 चा सनदी कायदा

(C) 1833 चा सनदी कायदा

(D) 1853 चा सनदी कायदा

77. वसाहतिक शासनाच्या कल्याणकारी बाजूचे उदाहरण म्हणजे सर जॉन माल्कम यांच्या सेवेत राहून विज्ञानाचा परिचय करून घेऊन यांनी रसायनशास्त्र हा ग्रंथ लिहिला :

(A) अर्लू बिन नारायण

(B) श्रीपती शेषाद्री

(C) गंगाराम तांबट

(D) रामजी बिन गणोजी चौगुले

78. रहनुमाई मझ्द्यासान सभा ही कशाची संघटना होती ?

(A) पारसी क्रीडा मंडळ

(B) पारसी पंचायतीचा विभाग

(C) पारसी समाज सुधारणेची संघटना

(D) पारसी धर्मार्थ दवाखाना

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



79. This cult founded by Karram Shah in the Garo Hill region revolted against the Jamindars advocating the rights of the rent farmers :

(A) Faraizi

(B) Pagalpanthi

(C) Khasi

(D) Naga

80. This Secretary of the Bombay Native Education and School Book Society founded The Engineer Institution in Mumbai in 1823 :

(A) John Briggs

(B) Colonel Pottinger

(C) Captain Jervis

(D) Major Candy

81. This famine in Nineteenth Century India was described as a 'Sea of Calamity'.

(A) Rajputana 1868-69

(B) Madras 1866-67

(C) Bengal 1860-61

(D) Orissa 1866-67

79. कर्मशाह यांनी गारो टेकड्यांच्या परिसरात स्थापन केलेल्या या पंथाने जमीनदारांच्या विरोधात कुळांची बाजू उचलून धरत उठाव केला ?

(A) फरैझी

(B) पागलपंथी

(C) खासी

(D) नागा

80. बॉम्बे नेटिव एज्युकेशन एन्ड स्कूल बुक सोसायटीच्या या कार्यवाहाने मुंबईत 1823 मध्ये द एंजिनिअर इन्स्टिट्यूशन स्थापन केली :

(A) जॉन ब्रिग्स

(B) कर्नल पॉटिंजर

(C) कॅप्टन जार्विस

(D) मेजर कॅन्डी

81. 'संकटाचा सागर' असे ज्याचे वर्णन केले जाते तो 19व्या शतकातील दुष्काळ कोणता ?

(A) राजपुताना 1868–69

(B) मद्रास 1866–67

(C) बंगाल 1860–61

(D) ओरिसा 1866–67

www.prepp.in



82. Just before the revolt of 1857, the highest post an Indian could occupy in the military was the Subhedar. The highest civil administrative post that an Indian could occupy was :

(A) Sadr Amin

(B) Taluqdar

(C) Mamlatdar

(D) Kanungo

83. They started a night school for mill workers and domestic workers in 1873 :

(A) Prarthana Samaj

(B) Bombay Association

(C) East India Association

(D) Satyashodhak Samaj

84. Mahatma Gandhi described ...........'s death as 'the setting of a great planet from India's solar system.'

(A) Gopal Krishna Gokhale

(B) B. G. Tilak

(C) Lala Lajpat Rai

(D) Bipin Chandra Pal

82. 1857च्या उठावापर्यंत सैन्यामध्ये भारतीय व्यक्तीला मिळू शकणारं मोठ्यात मोठं पद म्हणजे सुभेदार. तर मुलकी प्रशासनात भारतीय व्यक्तीला जास्तीत जास्त ................ या पदापर्यंत पोचता येत असे.

(A) सद्र अमीन

(B) तालुकदार

(C) मामलतदार

(D) कानुंगो

83. 1873 साली यांनी गिरणी कामगार आणि घरगड्यांसाठी रात्रशाळा सुरू केली :

(A) प्रार्थना समाज

(B) बॉम्बे असोसिएशन

(C) ईस्ट इंडिया असोसिएशन

(D) सत्यशोधक समाज

84. ''भारताच्या सौरमालिकेतील एक महान ग्रह हरपला'' असे वर्णन महात्मा गांधी यांनी ........ यांच्या मृत्यूचे वर्णन केले होते.

(A) गोपाळकृष्ण गोखले

(B) बी. जी. टिळक

(C) लाला लाजपत राय

(D) बिपीनचंद्र पाल

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



85. In his autobiography, Mahatma Gandhi has written a chapter entitled 'The Magic Spell of a Book', which refers to ............

(A) Bhagawadgeeta

(B) Tulsi Ramayana

(C) Unto This Last

(D) War and Peace

86. C. N. Mudaliyar was associated with :

(A) Ezhava movement

(B) Justice movement

(C) Nair movement

(D) Nadar movement

87. Arrange these Indian Initiatives in education in a chronological order :

(*i*) Bethune School, Calcutta

(*ii*) Banaras Hindu University

(*iii*) M.A.O. College, Aligarh

(*iv*) Hindu College, Calcutta

**Codes :**

(A) (*iv*) (*i*) (*iii*) (*ii*)

(B) (*iii*) (*iv*) (*ii*) (*i*)

(C) (*i*) (*ii*) (*iii*) (*iv*)

(D) (*ii*) (*iii*) (*iv*) (*i*)

85. महात्मा गांधींनी त्यांच्या आत्मचरित्रात 'एका पुस्तकांची जादूई मोहिनी' नावाचे प्रकरण लिहिले आहे, त्याचा संदर्भ या पुस्तकाशी आहे :

(A) भगवतगीता

(B) तुलसी रामायण

(C) अन्टु दिस लास्ट

(D) वॉर एन्ड पीस

86. सी. एन. मुदालियार खालीलपैकी कशाशी संबंधित होते ?

(A) एजवा आंदोलन

(B) न्याय आंदोलन

(C) नायर आंदोलन

(D) नादर आंदोलन

87. भारतीयांनी शिक्षणात घेतलेल्या पुढाकाराचा योग्य कालानुक्रम लावा :

(*i*) बेथून स्कूल, कलकत्ता

(*ii*) बनारस हिंदू विद्यापीठ

(*iii*) एम. ए. ओ. कॉलेज, अलीगड

(*iv*) हिंदू कॉलेज, कलकत्ता

**संहिता :**

(A) (*iv*) (*i*) (*iii*) (*ii*)

(B) (*iii*) (*iv*) (*ii*) (*i*)

(C) (*i*) (*ii*) (*iii*) (*iv*)

(D) (*ii*) (*iii*) (*iv*) (*i*)

88. This fearless lady gave up her life on 1st April 1940 in Srikakulam for protecting the forest rights of the peasants :

(A) Veera Gunnamma

(B) Ambujammal

(C) Janaki Ammal

(D) Krishnammal Jagannathan

89. Match List I with List II and select the *correct* answer from the codes given below the lists :

**List I**

(*a*) S. N. Sen

(*b*) M. G. Ranade

(*c*) R. Orme

(*d*) Alexander Dow

**List II**

(1) History of Indostan

(2) Historical Fragments of the Mogol Empire

(3) Foreign Biographies of Shivaji

(4) Rise of the Maratha Power

**Codes :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
| (B) | (*c*) | (*d*) | (*b*) | (*a*) |
| (C) | (*d*) | (*c*) | (*a*) | (*b*) |
| (D) | (*b*) | (*d*) | (*c*) | (*a*) |

88. 1 एप्रिल 1940 रोजी श्रीकाकुलममध्ये शेतकऱ्यांच्या जंगलविषयक हक्कांच्या रक्षणार्थ या धैर्यवान स्त्रीने बलिदान दिले :

(A) वीरा गुन्नाम्मा

(B) अंबुजाम्मल

(C) जानकी अम्मल

(D) कृष्णाम्मल जगन्नाथन्

89. यादी I आणि यादी II च्या जोड्या जुळवा आणि खाली दिलेल्या संहितेतून योग्य उत्तर निवडा :

**सूची I**

(*a*) एस. एन. सेन

(*b*) एम. जी. रानडे

(*c*) आर. ऑर्म

(*d*) अलेक्झांडर डाऊ

**सूची II**

(1) हिस्ट्री ऑफ हिंदुस्तान

(2) हिस्टोरिकल फ्रॅगमेंटस ऑफ द मोगेल एम्पायर

(3) फॉरेन बायोग्राफिस ऑफ शिवाजी

(4) राइस ऑफ मराठा पावर

**संहिता :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
| (B) | (*c*) | (*d*) | (*b*) | (*a*) |
| (C) | (*d*) | (*c*) | (*a*) | (*b*) |
| (D) | (*b*) | (*d*) | (*c*) | (*a*) |

90. Arrange the following events into correct chronological order :

(*i*) Cabinet Mission Plan

(*ii*) Mountbatten Plan

(*iii*) Wavell Plan

(*iv*) Cripps Mission Plan

**Codes :**

(A) (*ii*) (*i*) (*iii*) (*iv*)

(B) (*ii*) (*i*) (*iv*) (*iii*)

(C) (*i*) (*ii*) (*iii*) (*iv*)

(D) (*iv*) (*iii*) (*ii*) (*i*)

91. Which Indian painter was given the honour of illustrating the original version of the Indian Constitution ?

(A) Ramkinkkar Baij

(B) Vinod Behari Mohan

(C) Nandlal Bose

(D) Abanindranath Tagore

92. Dr. Babasaheb Ambedkar dedicated one of his scholarly works to his wife, Ramabai. Which was this book ?

(A) States and Minorities in India

(B) Annihilation of Caste

(C) Buddha and His Dhamma

(D) Pakistan or The Partition of India

90. खालील घटनाक्रम योग्य कालानुक्रमानुसार लावा :

(*i*) त्रिमंत्री योजना

(*ii*) माउंटबेटन योजना

(*iii*) वेव्हेल योजना

(*iv*) क्रिप्स योजना

**संहिता :**

(A) (*ii*) (*i*) (*iii*) (*iv*)

(B) (*ii*) (*i*) (*iv*) (*iii*)

(C) (*i*) (*ii*) (*iii*) (*iv*)

(D) (*iv*) (*iii*) (*ii*) (*i*)

91. कोणत्या चित्रकारांला भारतीय संविधानांच्या मूळ प्रतीचे चित्रण करण्याचा बहुमान मिळाला होता ?

(A) रामकिंकर बैज

(B) विनोद बिहारी मोहन

(C) नंदलाल बोस

(D) अबनींद्रनाथ टागोर

92. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या अभ्यासपूर्ण ग्रंथांपैकी एक त्यांच्या पत्नी रमाबाई यांना समर्पित केला. तो ग्रंथ कोणता ?

(A) स्टेट्स ऐन्ड मायनॉरिटीज इन इंडिया

(B) अनाहायलेशन ऑफ कास्ट

(C) बुद्ध ऐन्ड हिज धम्म

(D) पाकिस्तान ऑर द पार्टिशन ऑफ इंडिया



Prepp Your Personal Exams Guide

www.prepp.in
Your Personal Exams Guide



93. What is the major issue dealt with in Baba Padmanji's novel 'Yamuna Paryatan' ?

(A) Colonial Rule

(B) Difficulties in Travelling

(C) Life of Widowhood

(D) Blind Faith

94. What was *Tahzeeb ul Akhlaq* ?

(A) Principles of Deoband Islam

(B) Islamic School

(C) Association of Progressives

(D) Journal

95. This work by Mukundrao Patil was a satire depicting the injustices perpetrated by the hereditary village officials :

(A) Shetji Pratap

(B) Kulkarni Leelamrut

(C) Dhaddhashastri Paranne

(D) Deenmitra

96. Episodes from Krishna's life were popular themes in ...................... .

(A) Baramahi paintings

(B) Deccani paintings

(C) Rajput Ragamala paintings

(D) Mughal miniatures

93. बाबा पदमनजी यांच्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीत कोणत्या समस्येचे चित्रण केलेले आढळते ?

(A) वसाहतिक सत्ता

(B) दळणवळणाची गैरसोय

(C) विधवांचे आयुष्य

(D) अंधश्रद्धा

94. तहजीब उल अखलाक हे काय होते ?

(A) देवबंद इस्लामची तत्त्वे

(B) मुस्लिम धर्मीयांची शाळा

(C) प्रागतिक लोकांची संघटना

(D) नियतकालिक

95. मुकुंदराव पाटील यांची ही साहित्यकृती गावातील वंशपरंपरागत अधिकाऱ्यांच्या अन्यायकारक वागणुकीबद्दलची उपरोधिक रचना होती :

(A) शेटजी प्रताप

(B) कुलकर्णी लीलामृत

(C) ढद्ढाशास्त्री परान्ने

(D) दीनमित्र

96. कृष्णाच्या जीवनातील घटना ................ याचा प्रसिद्ध विषय आहे.

(A) बारामाही चित्रकला

(B) दख्खनी चित्रकला

(C) राजपूत रागमाला चित्रकला

(D) मुघल लघुचित्र

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



97. One of the main contribution of Church historiography is the concept of :
(A) Institutional history
(B) Local history
(C) Religious history
(D) Universal history

98. The term 'Toponymy' signifies the study of :
(A) Place Names
(B) Currency Names
(C) Paper used in writing Manuscripts
(D) Ink used in writing Manuscripts

99. The title of Varman was adopted by the kings of....................... .
(A) Samatta
(B) Gauda
(C) Kamrupa
(D) Punjab

100. Who among the following used the phrase 'Altekarian paradigm' ?
(A) Maitreyi Krishnaraj and Neera Desai
(B) Uma Chakravarti and Kumkum Roy
(C) Kumkum Sangari and Lata Mani
(D) Meenakshi Thapan and V. Geetha

97. चर्चप्रणीत इतिहासलेखन शास्त्राच्या योगदानामध्ये .................... ही महत्त्वाची संकल्पना आहे.
(A) संस्थात्मक इतिहास
(B) स्थानिक इतिहास
(C) धार्मिक इतिहास
(D) वैश्विक इतिहास

98. टोपोनिम ही संज्ञा .................. याचा अभ्यास सूचित करते.
(A) ठिकाणांचे नाव
(B) चलनाचे नाव
(C) हस्तलिखितासाठी वापरला जाणारा कागद
(D) हस्तलिखितासाठी वापरली जाणारी शाई

99. 'वर्मन' हे बिरूड ..................... राजांनी ग्रहण केले होते.
(A) समत्ता
(B) गौड
(C) कामरूप
(D) पंजाब

100. खालीलपैकी कोणी 'अलतेकरीयन पॅराडाईम' हा वाक्यप्रचार वापरला आहे ?
(A) मैत्रेयी कृष्णराज आणि नीरा देसाई
(B) उमा चक्रवर्ती आणि कुमकुम रॉय
(C) कुमकुम संगारी आणि लता मणी
(D) मीनाक्षी थापन आणि व्ही. गीता

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**ROUGH WORK**

Prepp
Your Personal Exam Guide